Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**प्राधिकृत प्रकाशन**

वर्ष ७, अंक ४३ ] गुरुवार ते बुधवार, ऑक्टोबर २८-नोव्हेंबर ३, २०२१/कार्तिक ६-१२, शके १९४३ [ पृष्ठे ६, किंमत : रुपये १०.००

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग एक—अमरावती विभागीय पुरवणी

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **भाग एक-शासकीय अधिसूचना** : नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार–अ, चार–ब व चार–क यांमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | नाही. |
| **संकीर्ण अधिसूचना** : नेमणुका इ. इ., केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | १-६ |
| **भाग एक-अ.**—(भाग चार-ब यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम याअन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना. | १-८ |

## शासकीय अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

नाही.

## संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

भाग १ (अ. वि. पु) म. शा. रा., अ, क्र. ९७५.

### जिल्हाधिकारी, यांजकडून

**शुद्धीपत्र**

क्रमांक मंअ-विभूसंअ-(अवप्र)-क्र.४-कावि-२४२-२०२१.—

जिल्हाधिकारी, अमरावती यांचे पत्र क्र.प्र.अ.-भू.सं.-अ.का.-८३-२०२१, दि. ५-२-२०२१ अन्वये उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), अ.व.प्र.क्र.-४, अमरावती यांच्या फाईलवरील भूसंपादन प्रकरण क्रमांक १७-४७-२०१७-१८, मौजा वनारशी, ता. व जि. अमरावती या प्रकरणात कलम १९ ची अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक अमरावती विभागीय पुरवणी, दिनांक फेब्रुवारी १८-२४, २०२१ रोजी पान क्रमाकं २-४, अनुक्रमांक १४२

वर प्रसिद्ध करण्यात आलेली होती. त्यात खालीलप्रमाणे दुरूस्ती वाचावी.—

भूसंपादन प्रकरण क्रमांक १७-४७-२०१७-१८, मौजा वनारशी, ता. व जि. अमरावती.

| या ऐवजी | | | असे वाचावे | | |
|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | सर्व्हे क्र./गट क्र. | संपादन करावयाचे क्षेत्र | अ. क्र. | सर्व्हे क्र./गट क्र. | संपादन करावयाचे क्षेत्र |
| | | हे. आर | | | हे. आर |
| ११ | ८५ पै. | २ १२ | ११ | २९ | २ १२ |

**संपादनाचे प्रयोजन.**—निम्न पेढी प्रकल्पाच्या मौजा वनारशी, ता. व जि. अमरावती येथील पर्यायी रस्ता वलगाव ते कुंड पांढरी रा. मा. २९८ ला सा. क्र. १/८०० पासून १०/०० ला पर्यायी वळण रस्त्याच्या संपादनाच्या कामाकरीता.

**पवनीत कौर,**

अमरावती : जिल्हाधिकारी,

दिनांक ८ ऑक्टोबर २०२१. अमरावती.

---

भाग १ (अ. वि. पु) म. शा. रा., अ, क्र. ९७६.

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक अका-भूसंपादन-कावि-६९४-२०२१. —

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या बुलडाणा जिल्ह्याच्या जिल्हाधिका-याने, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्यांचा निर्देश " उक्त अधिनियम " असा केला आहे.) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून अधिसूचना क्र. १६०० अ, दिनांक ११-०५-२०१६ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशिलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, बुलडाणा (जिल्ह्याच्या) जिल्हाधिका-याने, कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे, याबाबत त्यांची खात्री पटली आहे ;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाचे कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदींन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीनमध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटूंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी "पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची-चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे;

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, मलकापूर, यांस पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची - एक**

**संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन**

भूसंपादन प्रकरण क्रमांक एल.ए.क्यु.०१-हिंगणाभोटा-२०-२१, गाव हिंगणा भोटा, तालुका नांदुरा, जिल्हा बुलडाणा.

| अनुक्रमांक | भूमापन क्रमांक /सर्व्हे क्रमाक | अंदाजित क्षेत्र |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | ५८ | २ २९ |
| २ | ६३ | १ ५८ |
| ३ | ५० | ० ०६ |

**अनुसूची - एक**–चालू

| (१) | (२) | (३) |
| --- | --- | --- |
| | | हे. आर |
| ४ | ५० | ० ०६ |
| ५ | ५० | ० १० |
| ६ | ५१ | ० १० |
| ७ | ५४ | ० २९ |
| ८ | ५५ | ० २० |
| | एकूण . . | ४ ६८ |

**संपादनाचे प्रयोजन.**—जिगांव प्रकल्पाअंतर्गत बुडीत क्षेत्रात जाणा-या मौजे हिंगणा भोटा, ता. नांदुरा, जि. बुलडाणा या गावाचे पुनर्वसनासाठी मौजे हिंगणा भोटा येथील ४ ६८ हे. आर जमिनीचा भूसंपादन प्रस्ताव.

**अनुसूची - दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

प्रकल्पाचे नांव : जिगांव प्रकल्प (मोठा प्रकल्प).

प्रकल्पाचे वर्णन : जिगांव प्रकल्पाअंतर्गत बुडीत क्षेत्रात जाणा-या मौजे हिंगणा भोटा, ता. नांदुरा, जि. बुलडाणा या गावाचे पुनर्वसनासाठी.

समाजाला मिळणारे लाभ : या प्रकल्पामुळे शेतीसाठी पाणी, सार्वजनिक पाणीपुरवठा, उद्योग धंद्यांना पाणी पुरवठा होणार आहे. त्याच बरोबर ग्रामीण भागामध्ये रोजगार निर्मिती होणार असून ग्रामीण भागातील कष्टकरी, शेतकरी, भूमीहीन शेतमजूर यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून त्यांच्या जिवनमानात (STANDARD OF LIVING) सुधारणा होणार आहे.

**अनुसूची - तीन**

**पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन**

— निरंक —

**अनुसूची - चार**

**पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश**

— निरंक —

**टीप.**—उक्त जमिनीच्या नकाशाचे उप विभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी कार्यालय मलकापूर, येथे निरिक्षण करता येईल.

---

भाग १ (अ. वि. पु) म. शा. रा., अ, क्र. ९७७.

**शुद्धीपत्र**

क्रमांक अका-भूसंपादन-कावि-७२२-२०२१. —

या कार्यालयातील भूसंपादन प्रकरण क्रमांक ०१-हिंगणा भोटा-२०२०-२१, जिगांव प्रकल्पाचे बाधीत गांवठाण मौजे हिंगणाभोटा, ता. नांदुरा या गावाचे पुनर्वसन मौजे हिंगणाभोटा या प्रकरणातील कलम ११ ची अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक अमरावती विभागीय पुरवणी, दिनांक मार्च ४-१०, २०२१ रोजी पान क्रमांक ६ ते ८, अनुक्रमांक २८५ वर प्रसिद्ध झालेली आहे. परंतु उप अधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, नांदुरा यांचे पत्र क्र. भूसंपादन/मौजे हिंगणाभोटा-०१-२०-२१-२०२, जा. क्र. १६७०, दिनांक २४-६-२०२१ नुसार प्रकरणातील कलम ११ च्या प्रारंभिक

अधिसूचनेत झालेल्या चुकीची खालील गटामध्ये दुरूस्ती करण्यात येत आहे.—

| अ. क्र. | च्या ऐवजी गट क्रमांक | च्या ऐवजी संपादन क्षेत्र हे. आर | असे वाचावे गट क्रमांक | असे वाचावे संपादन क्षेत्र हे. आर | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | ५८ | २ २९ | ५८ | २ २९ | उप अधीक्षक, भूमि अभिलेख |
| २ | ६३ | १ ५८ | ६३ | १ ५८ | कार्यालय नांदुरा यांचे पत्र क्र. |
| ३ | ५० | ० ०८ | ५० | ० ०६ | भूसंपादन-मौजे हिंगणाभोटा-१- |
| ४ | ५० | ० ०८ | ५० | ० ०६ | २०-२१-२०२, जा. क्र. १६७० |
| ५ | ५० | ० ०८ | ५० | ० १० | दि. २४-०६-२०२१ प्रत्यक्ष |
| ६ | ५१ | ० ०९ | ५१ | ० १० | मोजणीअंती संपादन क्षेत्रामध्ये |
| ७ | ५४ | ० २९ | ५४ | ० २९ | बदल करण्यात आला आहे. |
| ८ | ५५ | ० २० | ५५ | ० २० | |
| | एकूण . . | ४ ६८ | एकूण . . | ४ ६८ | |

**एस. रामामुर्ती** (भा.प्र.से.),
जिल्हाधिकारी,
बुलडाणा.

बुलडाणा :
दिनांक ३० सप्टेंबर २०२१.

---

भाग १ (अ. वि. पु), म. शा. रा., अ, क्र. ९७८.

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक भू.सं.-कलि-कावि-२२४-२०२१. —

ज्याअर्थी, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून काढण्यात आलेली अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक संकीर्ण ११-२०१४-प्र.क्र.७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी, २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यास या सोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त जमीन " असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त सार्वजनिक प्रयोजन" असा केला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते, ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची-दोनमध्ये दिलेले आहे.

आणि म्हणून, उक्त अधिनियमाचे कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदींन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमी संपादनाच्या अनुषंगाने बाधीत व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची-तीनमध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमूद करावीत) ;

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश या सोबत जोडलेल्या अनुसूची-चारमध्ये दिलेला आहे ;

आणि, ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची-पाचमध्ये दिलेला आहे, (नियुक्ती करणे आवश्यक असेल तर, या अनुसूचीमध्ये तपशील नमूद करावा);

त्याअर्थी, आता, असे घोषीत करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (४) अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीची अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही :

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतु, आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धीपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका-यांकडून भरपाई दिल्या जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश " उक्त नियम " असा करण्यात आला आहे) यांच्या नियम १० च्या उप-नियम (३) द्वारे विहीत केल्याप्रमाणे भूमिअभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, दारव्हा, जि. यवतमाळ यांना पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची - एक

## जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक ०१-४७-२०२१-२०२२, गाव पिंप्री खुर्द, तालुका दारव्हा, जिल्हा यवतमाळ.

| अ. क्र. | भूमापन किंवा गट क्रमांक | क्षेत्र |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | १९ पैकी | ० ०८ |
| २ | १९ पैकी | ० ०५ |
| | एकूण . . | ० १३ |

## अनुसूची - दोन

## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नांव : कोल्हापुरी बंधारा.

प्रकल्प कार्याचे वर्णन : कोल्हापुरी बंधारा पद्धतीचे कामाकरीता.

समाजाला मिळणारे लाभ : या प्रकल्पाद्वारे जमिनीस सिंचनाचा लाभ होईल.

## अनुसूची - तीन

**बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे** :- विस्थापनाची आवश्यकता नाही. सबब माहिती निरंक.

## अनुसूची - चार

## पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणा-या अभिकरणाने दिलेला) सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश : दिनांक १३ मार्च २०१५ चे राजपत्रात प्रसिद्ध महाराष्ट्र शासनाची अधिसूचना क्रमांक संकीर्ण ०१-२०१५-प्र.क्र.३-अ-२, नुसार उक्त अधिनियमाचे कलम १०क नुसार सामाजिक प्रभाव निर्धारणाच्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देण्यात आलेली आहे.

**अनुसूची - पाच**

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील**

| | | |
|---|---|---|
| (अ) प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिका-याचे पदनाम | : | प्रशासक नियुक्तीची आवश्यकता नाही. |
| (ब) प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता | : | निरंक |
| (क) ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील | : | निरंक |

**टीप.—**उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, दारव्हा याचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

**अमोल येडगे,**

यवतमाळ :
दिनांक १६ सप्टेंबर २०२१.

जिल्हाधिकारी,
यवतमाळ.

---

भाग १ (अ. वि. पु), म. शा. रा., अ, क्र. ९७९.

**वाचा.—**१. शासन निर्णय, राजनैतिक सेवा विभाग, क्रमाक पी-१३-दोन-बी, दि. १६ जानेवारी, १९५८ आणि दि. ०६ ऑगस्ट १९५८.

२. या कार्यालयाचे आदेश क्र. कावि-आस्था.-कक्ष-१(१)१३-२०२१, दि. २०-०१-२०२१.

**स्थानिक सुटीबाबत आदेश**

क्रमांक कावि-आस्था.-कक्ष-१(१)-२२३-२०२१. —

ज्याअर्थी, शासन निर्णय, राजनैतिक सेवा विभाग, क्रमांक पी-१३ दोन-बी, दि. १६ जानेवारी, १९५८ आणि दि. ०६ ऑगस्ट, १९५८ अन्वये जिल्हाधिकारी यांना प्रत्येक वर्षी तीन स्थानिक सुट्ट्या जाहीर करण्याचे अधिकार प्रदान केलेले आहेत.

त्याअर्थी, मी, एस. रामामुर्ती, जिल्हाधिकारी, बुलडाणा संदर्भाकित आदेशान्वये सन २०२१ या वर्षाकरीता बुलडाणा जिल्ह्याकरीता तीन स्थानिक सुट्ट्या जाहीर केल्या आहेत. त्यापैकी आज रोजी दोन सुटया उपभोगलेल्या असून, तिसरी दि. ०६ ऑक्टोबर २०२१ रोजीची सार्वपित्री दर्श अमावस्ये निमित्तची स्थानिक सुटी उपभोगणे बाकी आहे.

ज्याअर्थी, पुढील आठवड्यात बुलडाणा जिल्ह्यामध्ये अनुसूचित जाती कल्याण समितीचा प्रशासकीय दौरा प्रस्तावित असून, सदर दौ-यांच्या अनुषंगाने दि. ०६ ऑक्टोबर २०२१ रोजी सर्व बुलडाणा जिल्हा कार्यालये यांना कार्यालयात उपस्थित राहणेबाबत निर्देश आहे.

त्याअर्थी, मी, एस. रामामुर्ती, जिल्हाधिकारी, बुलडाणा संदर्भाकित शासन निर्णयान्वये प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून यापूर्वी सन २०२१ या वर्षाकरीता जाहिर केलेल्या तीन स्थानिक सुट्ट्यांपैकी दि. ०६ ऑक्टोबर २०२१ रोजीच्या सार्वपित्री दर्श अमावस्ये निमित्तची तिसरी स्थानिक सुटी या आदेशान्वये रद्द करीत असून, या आदेशान्वये दि. ०६ ऑक्टोबर २०२१ **ऐवजी** दि. ०२ नोव्हेंबर २०२१ रोजीची धनत्रयोदशी निमित्तची तिसरी स्थानिक सुटी जाहीर करीत आहे.

**एस. रामामुर्ती** (भा.प्र.से.),

बुलडाणा :
दिनांक ३० सप्टेंबर २०२१.

जिल्हाधिकारी,
बुलडाणा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.